# महर्षी शिंदेंवरील पहिले संशोधन केंद्र कोल्हापुरात...

समीर देशपांडे
लोकमत न्यूज नेटवर्क



महर्षी शिंदे

कोल्हापूर : महाराष्ट्रामध्ये सामाजिक सुधारणा घडविण्यामध्ये मोठी कामगिरी केलेल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नावे राज्यभरातील पहिले संशोधन केंद्र कोल्हापुरात स्थापन झाले होते. मात्र, सध्या बंद असलेल्या या केंद्राच्या कामाची पुन्हा सुरुवात करण्यात येणार आहे. तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या उपस्थितीमध्ये येथील शहाजी महाविद्यालयात हे केंद्र स्थापन करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आबासाहेब शिंदे यांच्या संकल्पनेतून हे संशोधन केंद्र सुरू करण्यात आले होते. या शिक्षण संस्थेचे प्रमुख श्रीपतराव बोंद्रे यांच्या विनंतीनुसार यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक या कार्यक्रमासाठी कोल्हापुरात आले होते. मात्र, कालांतराने या संशोधन केंद्राच्या माध्यमातून फार काही भरीव काम होऊ शकले नाही.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख आणि विद्यापीठातील महर्षी शिंदे अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे आणि शहाजी महाविद्यालयातील प्रा. सुरेश शिखरे, प्रा. अवनीश पाटील यांच्यात विठ्ठल रामजी शिंदे यांचा विषय निघाला. तेव्हा प्रा. शिखरे यांनी शिंदे यांच्या नावे पहिले संशोधन केंद्र त्यांच्या महाविद्यालयात स्थापन झाले होते, अशी आठवण सांगितली.

डॉ. शिंदे यांनी शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण यांच्याकडे हा विषय काढला. तेव्हा शानेदिवाण यांनी असे केंद्र होते. मी सध्या महाविद्यालयाचा इतिहास लिहीत असून, त्यामध्येही ही माहिती घेण्यात आल्याचे सांगितले. १९७३ साली हे संशोधन केंद्र सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २५ हजार रुपयांचा निधी दिला होता. २००७ साली शिवाजी विद्यापीठामध्ये महर्षी शिंदे अध्यासनाची स्थापना करण्यात आली. त्याआधी या कामाला शहाजी महाविद्यालयातून सुरुवात झाली होती. परंतु, काही काळानंतर केंद्राचे कामकाज बंद पडले. मात्र, आता पुन्हा विद्यापीठाच्या अध्यासनाच्या सहकार्याने हे केंद्र पुनरुज्जीवित करणार असल्याचे प्राचार्य शानेदिवाण यांनी सांगितले.




कोल्हापूर येथील शहाजी महाविद्यालयात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या नावे सुरु करण्यात आलेल्या संशोधन केंद्राचे उद्घाटन तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले होते.

## शंकरराव मोरे यांच्या कागदपत्रांचे हस्तांतरण

याच उद्घाटन समारंभामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक, दोन वेळा खासदार झालेले शंकरराव मोरे यांच्या कागदपत्रांचे हस्तांतरणही करण्यात आले. यामध्ये मोरे यांच्या वह्या, असंख्य पत्रे, अहवाल, लेख, कात्रणे, पुस्तके यांचा समावेश आहे. सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर चळवळ, काँग्रेस आणि शेतकरी कामगार पक्षाशी निगडित पत्रव्यवहार यांचा समावेश आहे.

# 'वित्तीय, विमा क्षेत्रांसाठी एकच नियंत्रक असावा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तंत्रज्ञानाचा वापर करून आधार क्रमांकाशी सर्व सुविधा जोडल्यामुळे सर्वच व्यवहारांमध्ये सुसूत्रता आली. भविष्यात बँकिंग, वित्तीय बाजार आणि विमा या क्षेत्रासाठी एकच नियंत्रक असावा, अशी अपेक्षा बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज इन्स्टिट्यूटचे संशोधन सल्लागार प्रा. डॉ. शरिक निसार यांनी बुधवारी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या आर. एन. गोडबोले अध्यासनामार्फत 'भारतातील वित्तीय तंत्रज्ञानाची स्वीकृती : व्याप्ती व आव्हाने' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक) पुरवणाऱ्या कंपन्यांच्या संख्या वाढत आहे. निश्चलनीकरण व गेल्या वर्षभरातील कोरोना संसर्ग यामुळे संगणकीकृत आणि ऑनलाइन व्यवहारात वाढ होत आहे. तंत्रज्ञानाचे व्यापारीकरण ग्राहकांना वित्तीय सेवा देण्यास उपयुक्त ठरले आहे. मात्र, नियंत्रण, वैश्विक वित्तीय संस्था, नियमाधारित की तत्त्वाधारित नियंत्रण, एकल की बहुनियंत्रण आदी आव्हाने फिनटेक कंपन्यांसमोर असल्याचे प्रा. निसार यांनी सांगितले.

## अभ्यासक्रमात समावेश करावा

फिनटेकसंदर्भातील नव्या पिढीची गरज ओळखून आवश्यक ते बदल घडविले पाहिजेत. उच्चशिक्षण संस्थांनी फिनटेकबाबतचा वाढता कल विचारात घेऊन त्याचा अभ्यासक्रमात समावेश करावा, असे आवाहन कुलगुरु डॉ. शिर्के यांनी केले.

# तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक

कोल्हापूर : लिंग समानता प्रस्थापनेच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे शक्य आहे. या क्षेत्रातील अभ्यासक, कार्यकर्ते यांनी त्या दिशेने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी येथे केले.

विद्यापीठाचे बेटी बचाओ अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि एस. डी. महाविद्यालय, अलापुझ्झा (केरळ) यांच्या संयुक्त विद्यमाने 'नव्वदोत्तरी कालखंडातील लिंग अभ्यास : तंत्रज्ञानात्मक बाबी व सक्षमीकरणाचे वास्तव' विषयावरील ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी त्यांचे बीजभाषण झाले.

# विद्यापीठात उद्यापासून ऑनलाईन व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कार्यरत यूजीसी स्कीम फॉर पर्सन विथ डिसॅबीलिटीजअंतर्गत २३ ते २६ फेब्रुवारी या कालावधीत 'दिव्यांगांसमोरील अडचणी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. व्याख्यानमालेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते होणार आहे. डॉ. वैशाली कोल्हे, मुंबई, प्रा.डॉ. पी. टी. बाबूराज, केरळ , राजीव नायर, मुंबई, यजुवेंद्र महाजन, जळगाव मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन यूजीसी स्किम फॉर पर्सन विथ डिसॅबीलिटीजच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले आहे.

# विद्यापीठाकडून अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर, नोव्हेंबरमधील हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास (प्रथम वर्ष, प्रथम सत्र फ्रेश विद्यार्थी वगळून) मुदतवाढ दिली आहे. परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत.

विनाविलंब शुल्क २५ फेब्रुवारीपर्यंत, विलंब शुल्कासह ५ मार्च व अतिविलंब शुल्कासह १२ मार्चपर्यंत विद्यार्थ्यांना महाविद्यालय, पदव्युत्तर अधिविभागातून अर्ज करता येणार आहे. महाविद्यालयांना १ ते १६ मार्च याकालावधीत विद्यापीठात परीक्षा अर्ज याद्या सादर कराव्या लागणार आहेत. महाविद्यालय, पदव्युतर अधिविभागांना २७ फेब्रुवारीपासून परीक्षा ऑनलाईन अर्ज अप्रूव्ह करावे लागणार आहेत. अधिक माहितीसाठी परीक्षा विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रभारी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.